# गाँधीवाद : आजच्या काळाली गरज

*डॉ. कल्पना कदम बेद्रे

आजच्या आण्विक शास्त्रास्त्र स्पर्धेच्या काळात अनेक जागतिक प्रश्न निर्माण झालेले आहे. राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रश्न सोडविण्यासाठी व त्यातुन मार्ग काढण्यासाठी जगातील देशांनी आता सामुहिक प्रयत्नांना सुरवात केलेली आहे. गौतम बुद्ध आणि महात्मा गांधी यांनी सांगितलेल्या अहिंसेचा मार्ग. आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी सविनय कायदेभंगाचा मार्ग म्हणजे लोकशाहीचा मार्ग हाच ख-या अर्थाने सर्वाच्या अस्तित्वासाठे व कल्याणासाठे उपयुक्त मार्ग ह्या मतावर आता सर्व जगाचे एकमत झालेले आहे.

आज जगाने भौतीक सुखाच्या मागे लागून आपली प्रचंड तांत्रिक आणि शास्त्रीय प्रगती करुन घेतली आहे. भौतिक सुखे असतानाही आज जगातील प्रत्येकाला मानसिक समाधान लाभलेले नाही. तंत्र आणि शास्त्र राबवून मानसिक आणि अध्यात्मिक सुख लाभत नाही. यामुळेच जग आज अध्यात्म सुखाचा शोधात आहेच. आज मानवाने तंत्र आणि शास्त्र यांच्या सहाय्याने स्वतःजवळ प्रचंड संहारक शक्ती निर्माण केली आहे. आज संपुर्ण जग विनाशाच्या एक कड्यावर उभे आहे. या विध्वंसक शक्तिमुळे माणसाच्या शांततेचे मोल आणि आवश्यकता कळत आहे. महात्मा गांधी ज्या अहिंसेचे प्रेषित आहेच त्याचे महत्त्व जगाला पटेलच गांधीवाद हा जागतिक शांततेचा आणि विकासाचा एक अपरिहार्य मार्ग आहे.

**गांधीचा जीवन परिचय** आधुनिक भारताच्या इतिहासात महात्मा गांधीचे स्थान अत्युच्च आहे. लोकमान्य टिळकांनंतर १९२० ते १९४७ या कालखंडाला भारतीय राजकारण "गांधीयुग" म्हणुन ओळखले जाते कारण या काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळीची सुत्रे गांधीजीकडे होते. त्याप्रमाणे हि-याला अनेक पैलू असतात त्यातील प्रत्येक पैलू तितकाच महत्वाचा असतो त्याचप्रमाणे गांधीजीच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू पहावयास मिळतात त्यांनी सांगितले अभिनव मार्ग (सत्य, अहिंसा, सत्याग्रह, सविनय कायदेभंग, स्वदेशी) आजही जगाच्या कौतुकाचा विषय आहेत. विनोबाच्या मते, "भगवान बुद्धांनंतर सत्य व अहिंसेचा एवढा मोठा पुजारी दुसरा आला नाही."

महात्मा गांधीचे संपुर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. जन्म २३ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. १८८८ ते १८९१ या काळात त्यांनी कायद्याची पदवी घेण्यासाठे इंग्लंडला गेले. गांधींनी सत्याग्रहाच्या मार्गाने सर्वप्रथम द.आफ्रिका वर्णभेदिविरुद्ध लढा दिला व तो यशस्वी झाला. गांधीजींच्या विचारांवर अनेक प्रभाव जाणवतात. त्यात प्रामुख्याने हिंदु, बौद्ध, जैन या धार्मिक ग्रंथाचा सामावेश असुन रास्किन, टॉलस्टॉय, थोरो, लाओ-त्से, कन्फ्युशियस या तत्वज्ञांचा प्रभाव जाणवतो. **म.गांधीजीचे तत्वज्ञान** गांधीजीचे तत्वज्ञान म्हणजे चालता बोलता जीवनप्रवास होता कोणत्याही एकाच गोष्टीच्या मागे न लागता ज्या-ज्या चांगल्या गोष्टी त्यांना दिसल्या जाणवल्या त्याचा स्विकार त्यांनी मोठ्याा मनाने केला. सत्य, अहिंसा व सत्याग्रह या महान विचारांवर गांधीजीचे तत्वज्ञान उभारले आहे.

**सत्य व अहिंसा** टॉलस्टॉय या ख्रिश्चन विचारवंतांच्या The kingdom of god is within you या ग्रंथातुन अहिंसेच्या विचाराला गांधींना प्रेरणा मिळाली त्याच्या व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनात सत्य व अहिंसा या तत्वास परम महत्त्व आहे. त्यांचा राजकीय विचारांचा हा पाया ठरतो. म.गांधी म्हणतात, "अहिंसा हा भ्याडाचा किंवा नेभळटपणाचा मार्ग नव्हे. मृत्युला सामोरे जाणा-या शूरांचा तो मार्ग आहे. हाती शस्त्रे घेऊन जो मृत्युमुखी पडतो, तो निःसंशय शूर आहे. परंतु जरा देखील कच न खाता किंवा बोटे देखील न उचलता जो मृत्युला सामोरा जातो, तो अधिक शूर म्हटला पाहिजे. तुम्ही नामर्दपणावर अहिंसेचे अस्तर चढविण्यापेक्षा, तुमच्या मनात जर खरोखरच हिंसा धगधगत असेल तर हिंसेचे आचरण करणे अधिक चांगले, असे मि बिनदिक्कत सांगेन. नामर्दपणा पेक्षा हिंसा केंव्हाही श्रेयस्कर." युद्धाने हिंदुस्तानाचाच काय अखिल जगाचाही उद्धार होऊ शकणार नाही, अशी म.गांधीची दृढ श्रद्धा होती. न्यायाचे समर्थन करण्यासाठेसुद्धा हिंसा कुचकामी ठरु शकते त्याचप्रमाणे अहिंसेच्या या लढ्याात मला कुणी सोबती जरी मिळाला नाही तरी मी एकटाच हे कार्य करण्यात संतोष मनीन हे त्यांचे उद्गार त्यांचा आत्मविश्वास दर्शवतात. गांधींच्या मते अहिंसा हे काही तत्वज्ञान नाही तर तो माझ्या जीवनाचा श्वास आणि नियम आहेत. १९३५ साली 'हरिजन या वृत्तपत्रात अहिंसा म्हणजे, जगातील कोणासही आपल्या विचारांना शब्दांनी आणि कृतींनी न दुखविणे होय. अशी व्याख्या केलेली आहे.

प्रत्येक व्यक्तिच्या विचार, आचार आणि उच्चारातुन अहिंसेचे दर्शन व्हावे असे त्यांना वाटे. सत्याच्या प्राप्तीसाठी त्यांनी अहिंसेवर भर दिला यातुन त्यांची 'सत्याग्रह' हि नवी कल्पना पुढे आली. यंग इंडियामध्ये गांधीजी म्हणतात, "Where there is a only a choice between cowardice and violence, i would advice violence... I would rather have india resort to arms in order to defond her honour, than that she would in a cowerdly manner became a rematn a helpless witness to her own dishonour.' अहिंसा हि नकारात्मक शक्ति नसुन ती विजेपेक्षाही प्रभावी व भावात्मक शक्ती असुन अहिंसेच्या तत्वासाठी मी जगतो, अहिंसेसाठी मी जगु इच्छितो, अहिंसेसाठी माझी मरण्याचीही तयारी आहे. यापुढे जाऊन गांधीजी म्हणत वरिल सर्व विचार असे असले तरी अहिंसेवरील आपले विचार म्हणजे अखेरचे भाष्य होऊ शकत नाही असे ते नम्रपणे म्हणतात.

* यशवंत महाविद्यालय, नांदेड

माझा विचार हे अहिंसेवरील अखेरचे भाष्य समजू नका. मला स्वतःच्या मर्यादांची जाणीव आहे. सत्याचा शोध करणारा मी नम्र पाईक आहे. माझ्या प्रत्येक प्रयोगांमुळे अहिंसेवरिल माझी श्रद्धा दृढ झाली आहे, अहिंसा हि मानव जातीला उपयुक्त अशी एक सर्वश्रेळ शक्ती आहे. तिचा उपयोग व्यक्ती पुरताच मर्यादित नाही. तिचा प्रयोग समुदायालादेखील करता येईल, अशी माझी दृढ श्रद्धा आहे.

**सत्य** गांधीजीच्या मते सत्य व अहिंसा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजु असुन त्या शिवाय ते नाणे परिपुर्ण ठरु शकत नाही. व या दोन्हींच्या समन्वयातुन जन्मास येणारी शक्ती म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रहीसाठी सत्य विजयापेक्षाही प्रिय व मोलाचे असते. त्यामुळे १९२२ साली चौराचौरी येथे कायदेभंगाच्या चळवळीत हत्या घडली असता चळवळ मागे घेण्यात आली इतके दृढ गांधी त्यांच्या विचाराबाबत होते. सत्य या संकल्पनेचे महत्त्व विशद करताना त्यांनी ईश्वर व सत्य यांचा संबंध जोडला आहे. त्यांनी परमेश्वराला सत्य या संकल्पनेच्या ठिकाणी संबोधून. 'सत्य हि ईश्वर है और ईश्वरही सत्य है" समाजाची नैतिक पातळी उंचवण्यासाठी गांधीजीनी सत्यास आवश्यक मानले. सत्यासाठी मानवाने फायद्याचा त्याग करुन सत्यापासुन जराही विचलीत झालोच तर तो नैतिक गुन्हा समजावा असे स्पष्ट मत मांडले.

**सत्याग्रह**

**साध्य व साधनविचार** गांधीजींच्या तत्वज्ञानात साध्य व साधन यांच्या मीमांसास महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या मते साध्य जितके महत्त्वाचे तितकेच त्याकरिता वापरणारे साधन महत्त्वाचे साध्य विधायक असले म्हणुन साधने हिंसक असता कामा नये अन्यथा साध्य ला अर्थ उरणार नाही अशी त्यांची साधनशुचिता होती. साध्य व साधन या विचारांतुन त्यांनी आपले राजकीय विचार मांडले. "Everything is faar love & war' या उक्तीला त्यांचा विरोध होता. राजकारण हा समाज सेवा एक अधिमान्य मार्ग असुन त्यातुन समाजाचे कल्याण साधले जाते त्यामुळे राजकारणाला नैतिक अधिष्ठान असावे या विचारांचे गांधीजी होते. मॉकियाव्हली या आधुनिक राज्यशास्त्राच्या जनकाने आपल्या 'प्रिन्स' या ग्रंथात सत्ता हे प्रधान मुल्य मानुन त्यासाठी कोणत्याही साधनाचा वापराचे समर्थन केले परंतु गांधीच्या तत्वज्ञानात हे कधीच बसले नाही. देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय राजकारणातही गांधीजीनी नैतिकतेलाच प्राधान्य दिले. म्हणुन त्यांना राजकारणाचे अध्यात्मीकरण करणारे विचारवंत असे म्हटले जाते. गांधीजी आपल्या तत्वाचा आधार घेऊन राजकारणातील आपली रामराज्याची कल्पना मांडली आज संपुर्ण जगाला दहशतवाद व अण्वस्त्र स्पर्धा अशा अनेक समस्यांनी ग्रासले असतात आपल्याला गांधीजींच्या रामराज्याच्या कल्पनेचे आधार व वैशिष्ट्ये पाहणे व त्याचे अनुकरण जागतिक राजकारणात कसे होईल याकडे लक्ष पुरवावे लागेल. गांधीजींची रामराज्याची कल्पना अहिंसेच्या तत्वज्ञानावर आधारलेली होती.

**१) व्यक्तीवाद** : गांधीजींचा व्यक्तिवाद पाश्चात्य व्यक्तिवादाहुन भिन्न होता. "व्यक्ति हे साध्य आहे. राज्य हे व्यक्तिच्या सर्वांगिन विकासाचे साधन आहे. त्यामुळे राजाने व्यक्तिच्या सेवेची भूमिका ठेवली पाहिजे. व्यक्तीचे मालक होता कामा नये." अतिरेकी व्यक्तिवाद त्यांना मान्य नाही. अनिर्बंध व्यक्तिवाद जंगलाचा कायदा आहे. व्यक्ति पशु नाही त्यामुळे प्रत्येकाने सामाजिक मर्यादांचा मान ठेवला पाहिजे.

**२) अराज्यवाद** : अहिंसेवर आधारित समाजात सामाजिक नियंत्रण करण्याची जरुरी नसते म्हणून राज्य अनावश्यक ठरते गांधीजी जरी व्यक्तिवादी होते तरी त्यांनी व्यक्तीच्या कार्याच्या सामाजिक संदर्भाकडे दुर्लक्ष केले नाही. यात हक्कापेक्षा कर्तव्य अधिक महत्त्वाचे मानल्याने आदर्श अहिंसक समाज निर्माण होईल यावर गांधींचा दृढ विश्वास होता.

**गांधीवाद - आजच्या काळाची गरज** सध्याच्या जगात व्यक्तींच्या हक्कावर कर्तव्यापेक्षा अधिक भर दिला केल्यामुळे संघर्ष निर्माण होत आहे. गांधींच्या अहिंसेवर भ्याडपणा म्हणुन टिका केली जाते परंतु अंतरराष्ट्रीय जीवनात जरी त्यांनी सामान्यपणे अहिंसेचे समर्थन केले परंतु मानव जातीला धोका निर्माण झाल्यास हिंसेचे समर्थन केले उदा.१९३९ पोलंडवरील आक्रमणात पोलीश प्रतिकाराचे समर्थन तर १९३५ मध्ये जपानने चीनवर अत्याचारी युद्ध लादले तेव्हा चीनच्या सशस्त्र प्रतिकाराचे समर्थन त्यांच्या याच भुमिकेतुन भारताच्या काश्मिरमधिल लष्करी हस्तक्षेपाचे त्यांनी समर्थन केले अशा काही अपवादात्मक स्थितीत होणारी हिंसा हि अहिंसेच्या नजीक असते परंतु राजकीय हेतुने केलेली हिंसा त्यांना कधीही मान्य नव्हती. म्हणुन दहतवादी कृत्य हे गांधीवादाविरोधी ठरते. आज दहशतवाद हा राष्ट्राची अखंडता, एकता आणि सुरक्षितता या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न बनला असुन त्यामुळे जगाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे परिणाम घडत आहेत. धार्मिक-वांशीक गटातील अहिष्णुता आणि विद्रोप, आर्थिक विकासाचा अभाव, अविकसित राष्ट्रांना मिळणारी उपेक्षित व अन्यायकारक वागणूक लोकशाहीचा अभाव, आंतरराष्ट्रीय कायद्याचे बड्या राष्ट्राकडून उल्लंघन असे अनेक कारणे दहशतवाद निर्माण होण्यास कारणीभुत ठरत आहेत आणि जगात दहशतवादाच्या घटनांनी संख्यात्मक व गुणात्मक दृष्टीने भयंकर स्वरुप धारण केलेले आहे. जगभर असणा-या दहशतवादी संघटना व त्यांचे कार्यक्षेत्र सतत वाढत चालले आहे. या संघटनांना बडी राष्ट्रे आपापल्या हितसंबंधाप्रमाणे प्रत्यक्षा अप्रत्यक्ष मदत करतात. आपली जागतिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अमेरिका, ब्रिटन, रशिया, चीन यासारख्या महासत्ता आणि त्याचे हस्तक राष्ट्रे कायम सभ्यता सुसंस्कृतपणा अर्थात मानवीमुल्य धाब्यावर बसवुन दहशतवादाचा अवलंब करतात त्यामुळे हा प्रश्न आंतरराष्ट्रीय राजकारणात सर्वव्यापी बनला आहे. आज सर्व जग याविरुद्ध लढण्यासाठी विचार-मंथन करीत असताना हिंसेचे उत्तर प्रति-हिंसेने हे कुणालाच मान्य नाही किंवा ही जोखीम जागतिक राजकारणात महासत्ता सुद्धा होऊ इच्छित नाहीत कारण परस्परांकडे असणारे आण्विक शास्त्रास्त्राची भीती म्हणुनच आज सर्व जग दहशतवादाकडे व या सारख्या असणा-या समस्याचा तोडगा गांधीवादातुन शोधत आहे हाच आंतरराष्ट्रीय राजकारण भारताचा गौरव म्हणता येईल.

## सन्दर्भ ग्रन्थ

1. आधुनिक राजकीय विचारवंत–डॉ.वि.मा.बाचल, प्रा.स.म. गोळवलकर 2. आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास–डॉ. जयसिंगराव पवार 3. गाँधी विचार दर्शन, खंड 14 व 20–गाँधी वाङ्मय प्रकाशन समिती